जन लोकपाल विधेयक.

भ्रष्टाचाराला प्रभावीपणे प्रतिबंध करणे आणि भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठविणाऱ्यांना भक्कम संरक्षण पुरविणे यासाठी केंद्रात भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा उभारणे आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा राबविणे हे या विधेयकाचे हेतू आहेत.

संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ : १) या कायद्याला भ्रष्टाचारविरोधी, तक्रारींच्या निवारणांसाठीचा आणि भ्रष्टाचारविरोधात आवाज उठविणाऱ्यांना संरक्षण देणारा कायदा, २०१० असे म्हणता येईल. २) हा कायदा संमत झाल्यापासून १२८ व्या दिवसापासून याची अंमलबजावणी सुरू होईल.

व्याख्या : या कायद्यातील काही शब्दांच्या व्याख्या अशा :

१. कृती – लोकसेवक म्हणून कोणत्याही लोकसेवकाने केलेली कृती. यात त्याने घेतलेले निर्णय, केलेल्या शिफारशी किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्याच्या कामाशी संबंधित असलेल्या गोष्टींचा समावेश होईल. जाणीवपूर्वक कायद्याचा भंग करणे किंवा तत्सम सर्व कृतींचा यात समावेश होईल.
२. आरोप – लोकसेवकाशी संबंधित असलेले खालील प्रकारचे गांभीर्यपूर्वक केले गेलेले सर्व आरोप, 'आरोप' या संज्ञेत येतात.

अ) तो लोकसेवक जर सरकारी कर्मचारी असेल तर त्याच्यावर गैरवर्तणूक करत असल्याचा केला गेलेला आरोप.
ब) तो लोकसेवक भ्रष्टाचार करत असल्याचा त्याच्यावर केला गेलेला आरोप.

३) तक्रार : संरक्षण मिळण्यासंदर्भात आणि योग्य कारवाई करण्यासंदर्भात भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठविणाऱ्याची कोणत्याही प्रकारची तक्रार, त्याने केलेले कोणतेही विधान अगर आरोप किंवा विनंती.

४) भ्रष्टाचार : भारतीय दंड संविधानाच्या (इंडियन पीनल कोडच्या) चौदाव्या चाप्टरमध्ये किंवा भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत शिक्षेस पात्र ठरवली गेलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती.
कोणताही नियम किंवा कायदा यांच्यातील तरतुदींचा भंग करून एखाद्या व्यक्तीने सरकारकडून एखादा लाभ मिळविला असेल, तर हे लाभ मिळविण्यासाठी त्या व्यक्तीला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या सार्वजनिक सेवकांसह ती व्यक्ती भ्रष्टाचारात गुंतली असल्याचे समजले जाईल.
५) सरकार किंवा केंद्र सरकार : म्हणजे भारत सरकार.
६) सरकारी कर्मचारी : केंद्र सरकार किंवा उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय यांच्याशी निगडीत सरकारी खात्यांतील कर्मचारी. सरकारी सेवेत किंवा पदावर केव्हा ना केव्हा तात्पुरती, कायमस्वरूपी, बदली कर्मचारी म्हणून किंवा कंत्राटी पद्धतीवर नेमणूक अगर नियुक्ती झालेला कर्मचारी. यांमध्ये न्यायाधीशांचा मात्र समावेश होणार नाही.
७) तक्रार : आपल्यावर अन्याय झाल्याचा किंवा गैर प्रशासनामुळे आपल्याला त्रास भोगावा लागत अगर लागला असल्याचा एखाद्याने केलेला दावा.
८) लोकपाल : म्हणजे –
अ)या कायद्याखाली तयार करण्यात आलेले आणि या कायद्याच्या विविध तरतुदींअंतर्गत कार्यरत असलेले न्यायाधीशांचे खंडपीठ (बेंच). किंवा

ब) कायद्यात किंवा विविध नियमांत आणि अटींत किंवा या कायद्यातील विविध तरतुदींअंतर्गत काढल्या गेलेल्या विविध आदेशांत नमूद केल्याप्रमाणे या कायद्याची अंमलबजावणी करणारा आणि त्यानुसार कायद्यातील कामकाज आणि जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडणारा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी.

क) अन्य सर्व हेतूंसाठी सामूहिकपणे मंडळ म्हणून काम करणारे अध्यक्ष आणि सदस्य.

९) गैर प्रशासन : खालीलपैकी कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय कामकाजात केली गेलेली कृती किंवा तिच्यातून व्यक्त झालेला आशय हा गैर प्रशासन मानला जाईल.

अ) अकारण, अन्याय्य, जुलमी, किंवा अयोग्य प्रकारे केली गेलेली भेदभावाची कृती किंवा प्रशासकीय प्रक्रिया किंवा व्यवहार. किंवा

ब) कृती अगर प्रशासकीय प्रक्रिया किंवा व्यवहार यामध्ये जाणीवपूर्वक केले गेलेले दुर्लक्ष किंवा अक्षम्य विलंब

१०) गैरवर्तन : सीसीएस वर्तणूक नियमांतर्गत समजले गेलेले सर्व प्रकारचे वर्तन.

११) सार्वजनिक अधिकारी मंडळ (पब्लिक ऑथॉरिटी) म्हणजे कोणतेही स्वयंप्रशासित अधिकारी मंडळ किंवा मंडळ किंवा संस्था. हे मंडळ किंवा ही संस्था खालील अटी पूर्ण करणारे असावी.

अ) घटनेनुसार स्थापन झालेली किंवा घटनांतर्गत तरतुदींनुसार स्थापन किंवा गठीत झालेली असावी.

ब) संसदेने संमत केलेल्या कायद्यांतर्गत स्थापन किंवा गठीत झालेली असावी.

क) सरकारने काढलेले परिपत्रक किंवा आदेशानुसार स्थापन किंवा गठीत झालेली असावी आणि सरकारी मालकीच्या, नियंत्रणाखाली असलेल्या किंवा सरकारकडून वित्तपुरवठा होत असलेल्या एखाद्या तरी मंडळाचा तिच्यात समावेश असावा.

१२) लोकसेवक : सध्या किंवा पूर्वी खालीलपैकी कोणत्याही पदावर कार्यरत असलेली कोणतीही व्यक्ती.

अ) पंतप्रधान

ब) मंत्री

क) संसद सदस्य

ड) उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती.

इ) सरकारी कर्मचारी

फ)केंद्र सरकारच्या अगर कॉर्पोरेशनच्या किंवा कोणत्याही वैध मंडळाच्या नियंत्रणाखालील किंवा भारतीय संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याखाली स्थापन झालेले स्थानिक अधिकारी मंडळाचे अध्यक्ष अगर उपाध्यक्ष अगर सदस्य. स्थानिक अधिकारी मंडळामध्ये सहकारी संस्था किंवा कंपनी ॲक्ट, १९५६ च्या ६१७ कलमांतर्गत येणाऱ्या सरकारी कंपन्या किंवा सरकारने स्थापन केलेली कोणतीही समिती किंवा मंडळ यांचाही समावेश होतो.

ग) केंद्र सरकारने वेळोवेळी जाहीर केलेली अन्य अधिकारी मंडळे.

१३) सुव्यवस्था किंवा देखरेख यंत्रणा (व्हिजिलन्स अँगल). ही खालील बाबींकडे लक्ष देईल.

अ) सर्व प्रकारचे भ्रष्टाचार.

ब) मोठ्या प्रमाणातील किंवा जाणीवपूर्वक केले गेलेले दुर्लक्ष, निर्णय प्रक्रियेतील बेपर्वाई, यंत्रणा आणि प्रक्रिया यांचा बेमुर्वतखोरपणे केला गेलेला भंग, सार्वजनिक हित नसलेल्या बाबतीत अविचारीपणाने केलेले धाडस, नियंत्रण करणारे किंवा वरिष्ठ अधिकारी यांना वेळेवर माहिती न देणे.

क) हाताखालच्या कर्मचाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या किंवा कर्तव्यात कसूर केल्याच्या किंवा कार्यालयाचा गैरवापर केल्याच्या तक्रारी आल्यानंतर सरकारी कर्मचाऱ्याने कायद्यानुसार कनिष्ठ कर्मचाऱ्यावर जी कारवाई केलीच पाहिजे अशी कारवाई करण्यात आलेले अपयश किंवा कारवाई करण्यात झालेली दिरंगाई.

ड) प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे केले जाणारे पक्षपातीपणाचे वर्तन.

इ) तक्रार करणाऱ्यांना वेठीस धरणे किंवा त्यांच्याशी सूडबुद्धीने वागणे.
फ) सर्व संबंधित घटकांशी चर्चा केल्यानंतर प्रकरण हातावेगळे करण्यात अन्याय्य आणि अक्षम्य दिरंगाई झाल्याचे स्पष्ट होणे.
ग) गुन्हेगारांना मदत करण्यासाठी किंवा निष्पाप लोकांना त्रास देण्यासाठी अन्याय्य आणि पक्षपातीपणे चौकशी किंवा तपास करणे.
ह) लोकपालांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या अन्य कोणत्याही प्रकारच्या घटना किंवा वर्तन.
१४) तक्रार करणारी व्यक्ती : म्हणजे
अ) अन्याय्य बदली, बढती नाकारणे, योग्य आदर किंवा विभागीय प्रक्रिया नाकारणे, पक्षपातीपणा करणे यांसारख्या विविध प्रकारच्या अत्याचारांना बळी पडणारी व्यक्ती.
ब) शारीरिक इजा किंवा
क) या कायद्याखाली लोकपालांकडे तक्रार केल्यामुळे किंवा माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविल्यामुळे शारीरिक दुखापतींना प्रत्यक्ष बळी पडलेली व्यक्ती.

३. लोकपाल संस्थेची स्थापना आणि लोकपालांची नियुक्ती
१) लोकपाल नावाची एक संस्था स्थापन केली जाईल. तिचा एक अध्यक्ष आणि दहा सदस्य असतील. शिवाय काही अधिकारी आणि कर्मचारीही असतील. अध्यक्ष हा लोकपाल संस्थेचा प्रमुख असेल.
२) कायद्यातील तरतुदीनुसार, लोकपाल संस्थेच्या अध्यक्षाची आणि सदस्यांची निवड केली जाईल.
३) कायद्यात नमूद केल्याप्रमाणे लोकपाल संस्थेचा अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य कार्यालयीन सूत्रे हाती घेण्यापूर्वी राष्ट्रपतींसमोर शपथ घेईल.
४) हा कायदा लागू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत पहिल्या लोकपाल अध्यक्षांची आणि सदस्यांची सरकार नियुक्ती करेल आणि संस्थेची उभारणी करेल.
५) अध्यक्ष किंवा सदस्य यांच्या रिक्त जागी सरकार नवीन नियुक्ती करेल. या जागा खालील कारणांमुळे रिक्त होऊ शकतील.
अ) निवृत्ती. संबंधिताच्या निवृत्तीच्या तारखेच्या आधी तीन महिने नवीन नियुक्ती केली जाईल.
ब) एखादे अचानक उद्भवलेले कारण. या परिस्थितीत त्यानंतर महिन्याभराच्या आत नवीन नियुक्ती केली जाईल.
४. लोकपाल संस्थेचे अध्यक्ष आणि सदस्य

अध्यक्ष आणि सदस्यांनी अन्य कोणत्याही कार्यालयांच्या कामांत सहभाग घेऊ नये – लोकपाल संस्थेचे अध्यक्ष आणि सदस्य अन्यत्र कोठेही नोकरी करणारे नसावेत. तसेच ते संसदेचे किंवा कोणत्याही राज्याच्या कायदे मंडळाचे माजी सदस्य नसावेत. त्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. त्यांचा कोणत्याही व्यवसायाशी किंवा उद्योगधंद्याशीही संबंध नसावा.
ळ) कोणत्याही ट्रस्टचे किंवा नफ्याशी संबंधित असलेले कार्यालयीन कामकाज ते करत असतील, तर लोकपालचा कार्यभार सांभाळण्यापूर्वी त्यांनी तिथून राजीनामा देऊन बाहेर पडणे आवश्यक आहे.
ळळ) जर त्यांचा स्वतःचा कोणत्याही स्वरूपाचा व्यवसाय असेल, तर त्यांनी त्या व्यवसायाशी किंवा व्यवस्थापनाशी असलेले आपले सर्व संबंध संपुष्टात आणूनच लोकपालचा कार्यभार स्वीकारला पाहिजे.
ळळळ) ते अन्य कोणत्याही व्यवसायात असतील, तर त्यांनी ते काम लोकपालचे कामकाज स्वीकारण्याआधी आणि लोकपालचे कामकाज ते करत असेपर्यंत थांबवले पाहिजे.
ळीं) लोकपालचे कामकाज करत असताना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण होऊ शकेल, अशा प्रकारच्या कोणत्याही अन्य कामांमध्ये किंवा उपक्रमांमध्ये अध्यक्ष किंवा सदस्यांनी सहभाग घेऊ नये. लोकपालचे कामकाज ते करत असेपर्यंत अशा उपक्रमांतील आपला सहभाग त्यांनी स्थगित ठेवावा. हा सहभाग स्थगित ठेवल्यावरही लोकपालच्या त्यांच्या कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असेल, तर अशा व्यक्तीची नियुक्ती करण्यात येणार नाही.

५) लोकपालच्या कामकाजाचा कार्यकाल आणि सेवाविषयक इतर अटी

१) अध्यक्ष किंवा सदस्याने काम सुरू केलेल्या तारखेपासून पाच वर्षांपर्यंत त्याच्या कामकाजाचा कालावधी असेल. त्याला पुढील नियम लागू होतील.
अ) अध्यक्ष किंवा सदस्य यांना राजीनामा द्यावयाचा असेल, तर ते आपल्या हस्ताक्षरात लिहून राष्ट्रपतींकडे राजीनामा पाठवून देतील.
ब) या कायद्यातील तरतुदींनुसार या पदावरून संबंधित व्यक्तीला काढूनही टाकता येईल.
२) अध्यक्ष आणि सदस्य यांना अनुक्रमे भारताचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्याएवढे मासिक वेतन दिले जाईल.
३) याशिवाय त्यांना नियमानुसार भत्ते आणि निवृत्ती वेतनही दिले जाईल. भत्ते आणि निवृत्तीवेतन तसेच इतर अटींबाबत नियुक्तीनंतर संबंधितांना गैरसोईचे ठरतील असे फेरबदल केले जाणार नाहीत.
४) अध्यक्ष आणि सदस्य यांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन आणि अन्य कार्यालयीन प्रशासकीय खर्च 'कन्सोलिडेटेड फंड ऑफ इंडिया' मधून केला जाईल.
५) 'लोकपाल निधी' नावाचा एक स्वतंत्र निधीही उभारला जाईल. लोकपालांनी संबंधितांना केलेल्या दंडाच्या शिक्षेतून जमा झालेली रक्कम या निधीत साठवली जाईल. याशिवाय सार्वजनिक पैशाचे नुकसान झाल्याचे लोकपालांच्या तपासात उघड झाल्यास सरकारकडूनही त्याच्या दहा टक्के रक्कम लोकपाल निधीत जमा केली जाईल. या निधीचा विनियोग लोकपाल संस्थेचा विस्तार, दर्जा सुधारणे किंवा तिच्या कामकाजात सुधारणा घडवणे यासाठीच केला जाईल.
६) लोकपालचे काम केल्यानंतर किंवा करत असताना अध्यक्ष किंवा सदस्य यांची केंद्र किंवा राज्य सरकारच्या अखत्यारीतील कोणत्याही पदावर नेमणूक किंवा नियुक्ती होऊ शकणार नाही. तसेच त्यांना कधीही निवडणूकही लढवता येणार नाही. लोकपालच्या अध्यक्षांची अध्यक्षपदी पुनर्निवडणूक होऊ शकेल किंवा सदस्याची अध्यक्षपदी निवड होऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत दहा वर्षांहून अधिक काळ लोकपालचे काम कोणालाही करता येणार नाही.

६) अध्यक्ष आणि सदस्य यांची नियुक्ती
१) निवड समितीच्या शिफारशींनुसार, अध्यक्ष आणि सदस्य यांची राष्ट्रपती नियुक्ती करतील.
२) लोकपालच्या अध्यक्षपदी किंवा सदस्यपदी खालील व्यक्तींची निवड होऊ शकणार नाही.

अ)भारतीय दंड संविधान किंवा पीसी ॲक्टखाली ज्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचे आरोपपत्र दाखल झाले असेल किंवा सीसीएस कंडक्ट रुल्सखाली शिक्षा झालेली असेल अशी व्यक्ती.
ब)चाळीसहून कमी वय असलेली कोणतीही व्यक्ती.
३) लोकपालचे किमान चार सदस्य कायद्याचे शिक्षण घेतलेले असावेत.
४) अध्यक्ष आणि सदस्य यांची भ्रष्टाचारविरोधी लढ्यातील निष्ठा वादातीत असावी. तसेच त्यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात त्याआधी लढे दिलेले असले पाहिजेत.
५) निवड समिती खालीलप्रमाणे असेल.

अ) संसदेच्या दोन्ही सभागृहांचे अध्यक्ष ब) सर्वोच्च न्यायालयाचे दोन वरिष्ठ न्यायाधीश क) उच्च न्यायालयाचे दोन वरिष्ठ न्यायाधीश ड) मूळचे भारतीय असलेले सर्व नोबेल पारितोषिक विजेते. इ) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष फ) मूळचे भारतीय असलेले नजीकच्या काळातील दोन मॅगसेसे पारितोषिक विजेते. ग) कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल ऑफ इंडिया

ह) मुख्य निवडणूक आयुक्त ई) 'भारत रत्न' विजेते ज) सदस्य आणि अध्यक्ष पदाची कारकिर्द पूर्ण करून बाहेर पडलेले लोकपालचे सदस्य आणि अध्यक्ष

६) निवड समिती : सर्वोच्च न्यायालयाचे सर्वाधिक ज्येष्ठ असलेले न्यायमूर्ती निवड समितीचे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहातील.

७) निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल.

अ) ठराविक नमुन्यातील खुल्या जाहिराती देऊन शिफारशी मागवल्या जातील.

ब) शिफारस करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या उमेदवाराच्या कार्याचे दाखले देऊन तो निवडीस कसा पात्र आहे, ते स्पष्ट करावे.

क) उमेदवारांची यादी त्यांच्यासाठी प्राप्त झालेल्या ठराविक नमुन्यातील शिफारसपत्रांसह वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल.

ड) निवड समितीतील प्रत्येक सदस्य ही सर्व माहिती पाहून लोकपालच्या जेवढ्या जागा भरावयाच्या असतील, तेवढ्या आपल्या पसंतीच्या उमेदवारांच्या नावांची यादी तयार करेल.

इ) निवड समितीच्या जास्तीत जास्त सदस्यांची मते असलेल्या उमेदवाराचे नाव प्रथम असेल. त्याखालोखाल मते असलेल्याचे नाव त्याखाली येईल. याप्रमाणे प्राथमिक प्राधान्यक्रमाची यादी तयार केली जाईल. समान मते मिळालेल्या उमेदवारांची नावे एकाच प्राधान्यक्रमावर असतील.

फ) ही प्राधान्ययादीही वेबसाईटवर जाहीर केली जाईल.

ग) रिक्त जागांच्या तिप्पट नावांची यादी तयार केली जाईल.

ह) ही यादीही वेबसाईटवर टाकून लोकांकडून मते मागवली जातील.

ई) या उमेदवारांची पार्श्वभूमी आणि कार्य याविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी निवड समिती कोणत्याही मार्गांचा अवलंब करू शकेल.

ज) निवड समिती या उमेदवारांना चर्चेसाठी बोलावेल आणि त्यानंतर या चर्चेचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही जाहीर केले जाईल.

क) उमेदवाराविषयी मिळालेली सर्व माहिती निवड समितीतील प्रत्येक सदस्याला आगाऊ उपलब्ध करून दिली जाईल. त्यानुसार प्रत्येक सदस्य उमेदवारांचे मूल्यमापन करेल.

ल) निवड समितीचे सदस्य प्रत्येक उमेदवाराच्या माहितीविषयी परस्परांशी चर्चा करतील. त्यानंतर एकमताने अध्यक्ष आणि सदस्य यांची अंतिम निवड केली जाईल. जर सदस्यपदासाठी निवडल्या गेलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या निवडीला निवड समितीच्या तीन किंवा तीनहून अधिक सदस्यांनी लेखी विरोध दर्शवला, तर त्या सदस्याची निवड होऊ शकणार नाही.

म) निवड समितीच्या सर्व बैठकांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाईल आणि त्या सर्वांसाठी उपलब्ध असतील.

८) त्यानंतर पंतप्रधान या अंतिम नावांची राष्ट्रपतींकडे तातडीने शिफारस करतील. ही यादी मिळाल्यापासून महिन्याच्या आत राष्ट्रपती या उमेदवारांच्या नियुक्तींचे आदेश काढतील.

९) निवड प्रक्रिया सुरू असताना निवड समितीवरील एखाद्या सदस्याची निवृत्तीची तारीख आल्यास निवडीची अंतिम प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तो सदस्य कामकाज पाहील आणि त्यानंतरच निवृत्त होईल.

७) अध्यक्ष किंवा सदस्यांना पदावरून दूर करणे

१) लोकपालच्या कोणत्याही सदस्याला किंवा अध्यक्षाला राष्ट्रपतींच्या आदेशाशिवाय त्याच्या पदावरून दूर करता येणार नाही.

२) अध्यक्ष किंवा सदस्य यांना खालीलपैकी एका किंवा एकाहून अधिक कारणांसाठी त्यांच्या पदावरून दूर करता येईल.

अ) गैरवर्तन केल्याचे सिद्ध झाल्यास. ब) व्यावसायिक किंवा शारीरिक अक्षमता क) तो दिवाळखोर असल्याचे कायदेशीररित्या जाहीर झाल्यास ड) नैतिकदृष्ट्या खालच्या पातळीवरचा गुन्हा केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आल्यास. इ) लोकपालच्या कार्यालयाव्यतिरिक्त अन्य कार्यालयात तो वेतन घेऊन काम करत असल्यास. फ) त्याला एखाद्या

गोष्टीत अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून त्याच्या कामकाजावर विपरीत परिणाम होऊ शकत असलेले आर्थिक किंवा अन्य प्रकारचे स्वारस्य असल्यास. ग) एखाद्या प्रकरणात त्याने एखाद्याला कोणत्याही कृतीद्वारे अकारण झुकते माप दिल्यास किंवा त्याला अकारण धारेवर धरल्यास. ह) एखाद्या सदस्याने किंवा अध्यक्षाने कोणत्याही सरकारी यंत्रणेवर अन्याय्य किंवा अक्षम्य दबाव आणल्यास किंवा दबाव आणल्याचा प्रयत्न केल्यास. ई) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा ठरणारे कोणतेही दुष्कृत्य किंवा गैरवर्तन केल्यास. ज) सदस्याला किंवा अध्यक्षाला भारत सरकारच्या वतीने केल्या जाणाऱ्या कोणत्याही कंत्राटात किंवा करारात स्वारस्य असल्यास आणि मिळणाऱ्या नफ्यात किंवा कोणत्याही प्रकारच्या लाभात तो कोणत्याही प्रकारे सहभागी झाल्यास किंवा एखाद्या कंपनीचा तो सदस्य असल्यास आणि तिच्या नफ्यात त्याचा सहभाग असल्यास ते त्याचे गैरवर्तन समजले जाईल.

३) कोणत्याही सदस्याला किंवा अध्यक्षाला त्याच्या पदावरून खालील प्रक्रियेच्या साहाय्याने दूर केले जाईल.
अ) लोकपालच्या एका किंवा एकाहून अधिक सदस्यांना किंवा अध्यक्षाला त्या पदावरून दूर करण्यासाठी पुराव्यांसह एक किंवा एकाहून अधिक कारणे देऊन कोणीही व्यक्ती सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करू शकेल.
ब) तीन किंवा तीनहून अधिक न्यायाधीशांचे खंडपीठ नियुक्त करून त्यांच्यासमोर या अर्जाची सुनावणी केली जाईल. त्यासाठी खालीलपैकी एक किंवा अधिक कारवाई केली जाईल.
ळ) त्या व्यक्तीने दाखल केलेल्या कागदपत्रांच्या साहाय्याने निकाल देणे शक्य होत नसेल, पण आरोपात वरकरणी तथ्य वाटत असेल, तर सर्वोच्च न्यायालय या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी खास तपास पथकाची नियुक्ती करेल. हे खास तपास पथक आपला चौकशी अहवाल तीन महिन्यांच्या आत न्यायालयाला सादर करेल.
ळळ) तपास सुरू असल्याच्या कालावधीत संबंधित सदस्याचे काम अंशतः किंवा पूर्णपणे स्थगित ठेवण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालय घेऊ शकेल.
ळळळ) सकृतदर्शनी आरोपांत काहीही तथ्य न आढळल्यास याचिका फेटाळली जाईल.
ळींं) जर आरोप सिद्ध झाला, तर संबंधित सदस्य किंवा अध्यक्ष यांना त्या पदावरून दूर करण्यासाठी राष्ट्रपतींकडे शिफारस केली जाईल.
ीं) भ्रष्टाचारविरोधी कायद्याखाली शिक्षा होण्याजोगा गुन्हा असल्याचे सकृतदर्शनी पुराव्यांवरून आढळल्यास अशा प्रकरणांची थेट नोंदणी करून तपास केला जाईल.
क) लोकपालमधील एखाद्या न्यायाधीशाविरुद्ध एखादा खटला सुरू असेल, तर तीन न्यायाधीशांच्या खंडपीठामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या पाच ज्येष्ठ न्यायमूर्तींचा समावेशही केला जाईल. अशा परिस्थितीत तो न्यायाधीश खंडपीठाचा किंवा या समितीचाही सदस्य असणार नाही.
ड) तपास पूर्ण झाल्याशिवाय या याचिका फेटाळल्या जाणार नाहीत.
इ) जर तक्रारकर्त्याने याचिका हेतुपुरस्सर, खोडसाळपणाने किंवा दुष्ट हेतूने दाखल केल्याचा निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाने काढला, तर त्या परिस्थितीत तक्रारकर्त्याला दंड किंवा एक वर्षाची शिक्षाही होऊ शकेल.
फ) संबंधित सदस्य किंवा अध्यक्ष दोषी आढळल्यास सर्वोच्च न्यायालयाने केलेली शिफारस पंतप्रधान तातडीने राष्ट्रपतींकडे पाठवतील आणि राष्ट्रपती एका महिन्याच्या आत संबंधित सदस्य किंवा अध्यक्ष याला पदावरून दूर करण्याचे आदेश काढतील.

लोकपालचे अधिकार आणि कार्ये
८) लोकपालची कार्ये १) लोकपालवर खालील प्रकारच्या तक्रारी स्वीकारण्याची जबाबदारी असेल.
अ) भ्रष्टाचारविरोधी कायद्याखाली शिक्षा होऊ शकण्याजोग्या दुर्लक्ष किंवा अन्य दुष्कृत्यांबद्दलच्या तक्रारी.
ब)सरकारी कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनाविषयीच्या तक्रारी.

क) विविध गाऱ्हाणी.
ड) अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांच्या तक्रारी.
२) अशा तक्रारींची दखल घेऊन त्यांची चौकशी आणि तपास केल्यानंतर लोकपाल खालीलपैकी एक किंवा एकाहून अधिक प्रकारच्या कारवाई करू शकतात.
अ) सकृतदर्शनी तथ्य न आढळल्यास प्रकरण बंद करू शकतात.
ब) तथ्य आढळल्यास संबंधित सरकारी कर्मचारी आणि खासगी व्यक्ती किंवा कंपनी यांच्याविरुद्ध खटला दाखल करू शकतात.
क)सीसीएस कंडक्ट रुल्सअंतर्गत योग्य दंड भरण्याचा आदेश देऊ शकतात. भ्रष्टाचारविरोधी कायद्यांतर्गत एखादा अधिकारी दोषी असल्याचे आढळल्यास त्या कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई करू शकतात.
ड) ज्या प्रकरणाचा तपास सुरू असेल, त्याच्या आवश्यकतेनुसार एखादी ऑर्डर रद्द करणे, परवाना, भाडे किंवा परवानगी किंवा करार रद्द करणे किंवा त्याच्यात बदल करणे अशी कारवाईही करू शकतात.
इ) भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सामील असलेली फर्म किंवा कंपनी किंवा कंत्राटदार किंवा अन्य कोणीही संबंधित यांचा काळ्या यादीत समावेश करू शकतात.
फ) आदेशात नमूद केल्याप्रमाणे ठराविक वेळात आणि ठराविक प्रकारे संबंधित प्रकरणाच्या तक्रार निवारणासाठी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शक सूचना देऊ शकतात.
ग) लोकपालच्या आदेशांचे योग्य प्रकारे वेळेवर पालन न झाल्यास लोकपाल आपल्या अधिकाराचा वापर करू शकतात.
ह) कायद्यातील विविध तरतुदींच्या आधारे तक्रारकर्त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक कारवाई करू शकतात.
३) १ ते ४ क्रमांकांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारींची किंवा गाऱ्हाण्याची माहिती लोकपालला कोणत्याही स्त्रोताकडून मिळाल्यास ते स्वतःहून योग्य कारवाई करू शकतात.

४) भ्रष्टाचार, गैरवर्तणूक आणि सार्वजनिक तक्रारी यांचे प्रमाण कमी व्हावे, या दृष्टीने वेळोवेळी योग्य अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यपद्धतीत, प्रशासनात किंवा इतर यंत्रणेत सुधारणा करण्याविषयी लोकपाल मार्गदर्शक सूचना पाठवू शकतात.
५) सीसीएस कंडक्ट रुल्सअंतर्गत दंड करण्यासाठी लोकपाल हे शिस्तविषयक अधिकारी, नेमणूक अधिकारी म्हणून काम करू शकतात.
६) भ्रष्टाचारविरोधी कायद्याचा १९ वा सेक्शन रद्द केला जाईल.
७) या कायद्याखालील कोणत्याही कामकाजाला सीआरपीसी चा १९७ सेक्शन लागू होणार नाही. लोकपालांनी एकदा परवानगी दिली की तपास करण्यासाठी किंवा कोणत्याही कायद्याखाली खटल्याचे कामकाज सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या परवानग्या घेण्याची गरज उरणार नाही.
९) सर्च वॉरंट काढणे इ. १) आपल्याकडे असलेल्या माहितीच्या आधारे
अ) लोकपाल एखाद्या व्यक्तीसंदर्भात खालील बाबीं घडू शकतील, यावर विश्वास ठेवू शकतो.
ळ) या कायद्याखाली जिला एखादी नोटीस पाठविण्यात आलेली आहे, ती व्यक्ती चौकशीसाठी आवश्यक किंवा चौकशीशी संबंधित किंवा उपयुक्त ठरणारी एखादी मालमत्ता, कागदपत्रे किंवा वस्तू उपलब्ध करून देणार नाही.
ळळ) त्या व्यक्तीने एखाद्या कायद्यामुळे किंवा नियमामुळे त्यातून पळवाट शोधण्यासाठी आपल्याकडे असलेला पैसा, दागदागिने किंवा अन्य किमती वस्तू अगर आपली इतर मालमत्ता जाहीर केलेली नसू शकते.
ब) लोकपालाने सुरू केलेली कोणतीही चौकशी किंवा कामकाज यांसाठी सर्वसाधारण तपास किंवा पाहाणी करण्याची आवश्यकता असू शकते.

तो सर्च वॉरंट देऊन पोलीस निरीक्षक किंवा त्याहून उच्च दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याला तपास सुरू ठेवण्याचा अधिकार प्रदान करू शकतो. हे अधिकार खालील प्रकारचे असू शकतात.

ळ) एखाद्या इमारतीत किंवा ठिकाणी पैसा, सोने, चांदी, दागदागिने किंवा इतर मौल्यवान वस्तू ठेवले असल्याचा लोकपालाला संशय असेल, त्या इमारतीत किंवा ठिकाणी प्रवेश करून तपास करणे.

ळळ) ज्या वस्तूसाठी तपास सुरू असेल, ती वस्तू लपवून ठेवल्याचा संशय असलेल्या व्यक्तीचा शोध घेणे.

ळळळ) तपासासाठी कोणत्याही दरवाजाचे, पेटीचे, लॉकरचे, कपाटाचे किंवा तत्सम गोष्टींचे कुलूप तोडणे

उपकलम ळ)नुसार ज्यावेळी चाव्या उपलब्ध नसतील अशा वेळी ती मालमत्ता, कागदपत्रे, पैसा, सोने चांदी, दागदागिने जप्त करणे.

ळीं) कोणत्याही मालमत्तेवर किंवा कागदपत्रावर किंवा ओळखीच्या खुणा करणे किंवा त्याच्या प्रती काढून घेणे किंवा

ीं) अशी मालमत्ता, कागदपत्रे, सोने चांदी, दागदागिने किंवा अशाच प्रकारच्या मौल्यवान वस्तूची यादी तयार करणे किंवा त्यांचा तपशील नोंदविणे.

२) उप विभाग १ मधील तपास आणि जप्तीच्या कामासाठी कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर्स, १९७३ मधील तपास आणि जप्ती याविषयीच्या तरतुदी लागू होतील.

३) उपविभाग १ खाली कोणत्याही कारणासाठी लागू करण्यात आलेले वॉरंट हे कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर्स, १९७३ च्या ९३ व्या सेक्शनखाली लागू करण्यात आलेले न्यायालयाचे वॉरंट समजले जाईल.

१०) पुरावा : १) या कायद्याखाली करण्यात येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या तपासासाठी या सेक्शनच्या तरतुदींनुसार (यात तपासाआधी जर प्राथमिक चौकशी करण्यात आली असेल, तर तिचाही समावेश होतो.)लोकपालला संबंधित तपासकामासाठी आवश्यक असलेली माहिती किंवा कागदपत्रे मिळविण्यासाठी ज्या व्यक्तीची आवश्यकता आहे, असे वाटत असेल, त्या कोणत्याही लोकसेवकाला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला लोकपाल बोलावू शकेल. २)कोड ऑफ सिव्हिल प्रोसीजर, १९०८ खाली होणाऱ्या तपासांप्रमाणे, हे तपास असतील, तर अशा प्रकारच्या कोणत्याही तपासकामासाठी (यात प्राथमिक चौकशीचाही समावेश होतो.) लोकपालला सिव्हिल कोर्टाचे सर्व अधिकार असतील. खालील बाबींमध्ये लोकपालला हे अधिकार असतील.

अ) कोणत्याही व्यक्तीला न्यायालयात हजर राहाण्यास फर्मावणे आणि भाग पाडणे. तसेच त्याची शपथेवर तपासणी करणे.

ब) कोणतीही कागदपत्रे शोधणे आणि ती तपासासाठी उपलब्ध करण्यास सांगणे.

क) ॲफिडेव्हिटच्या साहाय्याने पुरावे मिळविणे.

ड) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक रेकॉर्ड किंवा कागदपत्राची प्रत मागवणे

इ) साक्षीदार किंवा कागदपत्रे यांच्या तपासणीसाठी अगर परीक्षणासाठी आयोग नेमणे.

फ) चुकीचा किंवा मनस्तापजन्य दावा (क्लेम) किंवा बचाव केल्याचे निष्पन्न झाल्यास भरपाईची रक्कम भरण्याचा आदेश देणे.

ग) विलंब केल्याबद्दल भरपाई देण्याचा आदेश देणे.

ह) यांसारख्या अन्य काही विशिष्ट बाबींचे अधिकारही असतील.

३) लोकपालसमोर चालणाऱ्या कामकाजाला भारतीय दंड संविधानाच्या (इंडियन पिनल कोडच्या) सेक्शन १९३ खाली चालवल्या जाणाऱ्या न्यायालयीन कामकाजाचा दर्जा असेल.

११) लोकपालाचे अहवाल वगैरे. १) लोकपालचा अध्यक्ष विहित नमुन्यात लोकपालच्या कामकाजाचा संक्षिप्त वार्षिक अहवाल राष्ट्रपतींना सादर करेल. २) हा वार्षिक अहवाल मिळाल्यानंतर राष्ट्रपती स्पष्टीकरण करणाऱ्या निवेदनासह संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर त्या वार्षिक अहवालाची प्रत ठेवतील. ३) दर महिन्यात जी प्रकरणे निकालात काढली गेली असतील,

त्यांच्या थोडक्यात तपशीलासह या प्रकरणांची माहिती लोकपालच्या वेबसाईटवर दर महिन्यात ठेवली जाईल. त्यात या प्रकरणाचा निकाल आणि केलेली कारवाई किंवा कोणती कारवाई करण्याचे निश्चित करण्यात आले आहे याची माहिती दिली जाईल. आदल्या महिन्यात लोकपालकडे आलेल्या सर्व प्रकरणांची यादीही वेबसाईटवर दिली जाईल. तसेच त्यापैकी निकाल दिल्या गेलेल्या आणि प्रलंबित प्रकरणांची माहितीही दिलेली असेल.

१२) लोकपालच्या सदस्यांना पोलीस अधिकाऱ्याचा दर्जा असेल. १) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या ३६ व्या सेक्शनखाली चालविल्या जाणाऱ्या प्रकरणांसाठी लोकपालचा अध्यक्ष, सदस्य आणि लोकपालच्या तपास विभागाचे अधिकारी यांना पोलीस अधिकाऱ्याचा दर्जा असेल.

२) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत येणाऱ्या एखाद्या गुन्ह्याचा तपास करत असताना, याच प्रकरणातील दुसऱ्या कोणत्याही गुन्ह्यासाठी दुसरा एखादा कायदा लागू होत असल्याचे निदर्शनास आले, तर त्या दुसऱ्या कायद्याखालीही ते तपास करू शकतील.

१३) आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास असलेले अधिकार : १)लोकपालच्या प्रत्येक आदेशात त्या आदेशाचे पालन ज्याने करावयाचे असेल, त्या अधिकाऱ्याचे नाव स्पष्टपणे नमूद केलेले असेल. याशिवाय या आदेशाची अंमलबजावणी कोणत्या पद्धतीने आणि किती वेळात झाली पाहिजे, याचेही स्पष्ट निर्देश या आदेशात दिले जातील.

२) जर लोकपालने दिलेल्या आदेशाची निर्धारित वेळेत आणि पद्धतीने अंमलबजावणी झाली नाही, तर आदेशाची अंमलबजावणी न करण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याला दंड करण्याचा निर्णय लोकपाल घेऊ शकेल.

३) त्या विभागाच्या वेतनाचे आणि बटवड्याचे काम करणाऱ्या अधिकाऱ्याला (ड्रॉइंग अँड डिसबर्सिंग ऑफिसर) लोकपाल संबंधित दोषी अधिकाऱ्याच्या वेतनातून थेटपणे दंडाची रक्कम कापून घेण्याचे आदेश देऊ शकेल.

दंड आकारण्याआधी संबंधिताला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी मात्र दिली जाईल.

जर वेतन आणि बटवड्याचे काम करणारा अधिकारी संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून दंडाची रक्कम कापून घेऊ शकला नाही, तर तो स्वतःच तेवढ्या रकमेच्या दंडास पात्र ठरेल.

४)लोकपालच्या आदेशाचे पालन न झाल्यास लोकपाल संबंधिताविरूद्ध आपल्या अवमानाचा गुन्हा दाखल करू शकतो. लोकपालाचा अवमान हा उच्च न्यायालयाचा अवमान समजला जाईल. त्यामुळे न्यायालयाचा अवमान कायदा, १९७१ (सेंट्रल ॲक्ट ७० ऑफ ७१) मधील तरतुदी या संदर्भातील गुन्ह्यासाठी लागू होतील. फक्त या कायद्यातील उच्च न्यायालयाचे उल्लेख आणि संदर्भ वगळून तिथे लोकपालविषयक उल्लेख आणि संदर्भ दिले जातील.

१३ अ) भ्रष्टाचारविरोधी कायद्यातील सेक्शन चार अंतर्गत नियुक्त केले जाणारे खास न्यायाधीश : भ्रष्टाचारविरोधी कायदा, १९८८ च्या सेक्शन ४ अंतर्गत वर्षभरात प्रत्येक भागासाठी किती खास न्यायाधीश आवश्यक आहेत, याचे मूल्यमापन करून खास न्यायाधीश नियुक्त करण्याची शिफारस लोकपाल राष्ट्रपतींना करेल. त्यानुसार राष्ट्रपतींकडून तीन महिन्यांच्या आत तेवढे खास न्यायाधीश नियुक्त केले जातील. या कायद्यांतर्गत येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाची ट्रायल वर्षभरात पूर्ण व्हावी, एवढे खास न्यायाधीश नियुक्त करण्याची शिफारस लोकपाल करेल.

१४) लोकपालचे कामकाज

१) लोकपाल या संस्थेचे प्रशासन आणि देखरेख याअंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या कामकाजाला अध्यक्ष जबाबदार असेल.

२) लोकपालच्या कामकाजासाठी नियम आणि अटी तयार करणे, अंतर्गत यंत्रणा विकसित करणे, लोकपालच्या विविध अधिकाऱ्यांना कामे नेमून देणे, विविध अधिकाऱ्यांना वेगवेगळे अधिकार प्रदान करणे, इ. सर्व धोरणात्मक निर्णय अध्यक्ष आणि सदस्य एकत्रितपणे एक मंडळ म्हणून घेतील.

३) आर्थिक मदत आणि मनुष्यबळ यासंबंधी लोकपालच्या गरजा काय आहेत, हे ठरविण्यासाठी लोकपालच्या अध्यक्षांची पंतप्रधानांसमवेत एक बैठक होईल. या बैठकीतील निर्णयांच्या आधारे लोकपालला सरकार स्रोतांचा पुरवठा करेल.

४)तीन किंवा अधिक सदस्यांच्या खंडपीठांच्या मदतीने लोकपालचे कामकाज चालेल. या खंडपीठांच्या सदस्यांची निवड खुल्या पद्धतीने संगणकाच्या साहाय्याने केली जाईल. तसेच प्रत्येक खंडपीठाकडे कोणतीही प्रकरणे खुल्या निवड प्रक्रियेद्वारे सोपवली जातील. प्रत्येक खंडपीठात कायदेविषयक पार्श्वभूमी असलेला किमान एक तरी सदस्य असेल.

५) ही खंडपीठे खालील गोष्टींना जबाबदार असतील.

ळ) प्राथमिक चौकशीनंतर खटल्यांचे कामकाज थांबविण्याची परवानगी देणे. ळळ) तपास पूर्ण झाल्यानंतर प्रकरणाचे कामकाज थांबविण्याची किंवा सीसीएस कॉंडक्ट रुल्स अंतर्गत शिक्षा देण्याची आणि / किंवा खटल्याचे कामकाज पुढे चालू ठेवण्याची परवानगी देणे.

ळळळ) सेक्शन २८ आणि सेक्शन १३ ब खाली आदेश काढणे.

६) कोणत्याही प्रकरणाचा तपास सुरू करण्याचा निर्णय लोकपाल घेऊ शकते.

७) मंत्रिमंडळाचा एखादा सदस्य किंवा उच्च अगर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्याविरुद्धच्या प्रकरणाचा तपास किंवा कामकाज सुरू करणे याविषयी अध्यक्ष आणि लोकपालचे सर्व सदस्य यांच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल. या बैठकीतील सर्व चर्चा आणि मुद्दे, तसेच नोंदी सर्वांच्या माहितीसाठी जाहीर केल्या जातील.

१५) लोकपालकडे तक्रार करणे : १) या कायद्यातील तरतुदींनुसार, कोणतीही व्यक्ती या कायद्याखाली लोकपालकडे तक्रार करू शकेल.

तक्रारकर्त्याचा मृत्यू झाला असेल किंवा अन्य कोणत्याही कारणाने तो तक्रारीसंदर्भातील कामकाजाच्या वेळी स्वतः उपस्थित राहू शकत नसेल, तर त्याचा कायदेशीर प्रतिनिधी किंवा त्याने लेखी स्वरूपात अधिकार दिलेली कोणीही अन्य व्यक्ती त्याच्या वतीने कामकाजात भाग घेऊ शकते.

२) तक्रार कोऱ्या कागदावरही करता येऊ शकते. परंतु लोकपालने स्पष्ट केलेले सर्व तपशील तिच्यात असले पाहिजेत.

३) ही तक्रार मिळाल्यानंतर ही तक्रार हा आरोप आहे की गाऱ्हाणे आहे की तक्रारकर्त्याने संरक्षणाची केलेली मागणी आहे, की यापैकी दोन किंवा त्याहून अधिक प्रकारांचे मिश्रण आहे, हे लोकपाल ठरवेल.

४) लोकपालने प्रत्येक तक्रारीचा निपटारा केलाच पाहिजे. फक्त निनावी किंवा बनावट नावाने केल्या गेलेल्या तक्रारी याला अपवाद असतील.

या तक्रारींचे कामकाज बंद केले जाईल.

१६) या कायद्याच्या तरतुदींअंतर्गत लोकपालकडून केल्या जाणाऱ्या प्रकरणांच्या तपासांमध्ये लोकसेवकाच्या ज्या कृतीविषयी किंवा कारवाईविषयी तक्रार किंवा आरोप असेल, त्या कृतीचा किंवा कारवाईचा तपास लोकपालकडून केला जाईल. या कृतीविषयी सरकारकडून लोकपालला संदर्भ दिला गेलेला असू शकेल किंवा आलेल्या तक्रारींवरून लोकपाल हा तपास करू शकेल.

१७. तपासासाठी सुयोग्य नसलेल्या गोष्टी : १) या कायद्याखाली केल्या गेलेल्या खालील प्रकारच्या कृतींच्या गाऱ्हाण्यांबाबत लोकपाल कोणताही तपास करणार नाही.

ळ) फिर्यादीने दुसऱ्या एखाद्या अधिकाऱ्यासमोर अपील, पुनर्विलोकन, आढावा या कोणत्याही मार्गाने किंवा अन्य कोणत्याही कायद्याखाली ही तक्रार दाखल केलेली असेल आणि त्यावर उपाय सुचविला गेला असेल; परंतु फिर्यादीने त्या उपायाची अंमलबजावणी केलेली नसेल तर.

ळळ) फिर्यादीने दुष्ट हेतूने तक्रार केलेली नसेल, पण कोणत्याही न्यायालयीन किंवा अर्धन्यायालयीन मंडळाने ती तपासासाठी घेतलेली असेल तर.

ळळळ) कोणत्याही न्यायालयात किंवा सक्षम अर्ध न्यायालयीन मंडळासमोर गाऱ्हाणे मांडले गेलेले हे संपूर्ण प्रकरण प्रलंबित असेल तर.

ळीं) एखादे गाऱ्हाणे प्रचंड विलंबाने किंवा ज्या विलंबाचे योग्य स्पष्टीकरण देता येणार नाही, एवढ्या उशिराने मांडले गेले असेल तर.

२) संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या प्रिसायडिंग ऑफिसरच्या संमतीने केल्या गेलेल्या किंवा त्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचा, कृतीचा किंवा कारवाईचा तपास करण्याचे अधिकार या कायद्यातील कोणत्याही गोष्टीचा वापर करून लोकपालला दिले जाणार नाहीत.

३)अन्य कोणताही कायदा, नियम यांच्या कोणत्याही तरतुदींखाली तक्रारकर्त्याच्या तक्रारीवर अपील, पुनर्विलोकन, आढावा किंवा तत्सम स्वरूपाच्या मार्गाने उपाय काढला जाऊ शकत असेल, तर या कायद्यातील तरतुदीं त्या कायद्यातील तरतुदींशिवायच्या अतिरिक्त तरतुदी असतील. त्या कायद्याचा वापर करून असे उपाय शोधण्याच्या तक्रारकर्त्याच्या हक्कावर या कायद्यामुळे कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही किंवा त्याच्या या हक्काला या कायद्यामुळे मर्यादा पडणार नाहीत.

४) गैरवर्तणूक, भ्रष्टाचार या संदर्भातील तक्रारी वा संरक्षणाची मागणी करणाऱ्या तक्रारकर्त्याने केलेली तक्रार यांची दखल घेण्यापासून या सेक्शनमधील कोणतीही गोष्ट लोकपालला रोखू शकणार नाही.

१८) तक्रारी आणि तपास याविषयीच्या तरतुदी

ळ) अ) आरोप किंवा गाऱ्हाणे किंवा दोन्ही एकत्र असलेली तक्रार मिळाल्यानंतर किंवा स्वतःच पुढाकार घेऊन एखादा खटला सुरू केल्यानंतर लोकपाल कागदपत्रे पाहिल्यानंतर कदाचित या प्रकरणाची चौकशी करणे किंवा तपास करणे याविषयीचा निर्णय घेऊ शकेल. किंवा चौकशी अगर तपास सुरू करण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करण्याचा निर्णयही घेऊ शकेल किंवा तपासासाठी योग्य कारण असल्याचे आढळल्यास दुसऱ्या एखाद्या योग्य व्यक्तीकडे प्राथमिक तपास सोपवू शकेल. या प्राथमिक तपासाचा निष्कर्ष, तसेच जर ही तक्रार फेटाळली गेली तर त्याविषयीची कारणे आणि प्राथमिक तपासातील सर्व मुद्दे यांच्या तपशीलासह ही बाब फिर्यादीला किंवा तक्रारकर्त्याला कळवली जाईल. जर एखादी तक्रार फेटाळली गेली, तर त्यानंतर ते संपूर्ण प्रकरण सार्वजनिक समजले जाईल. दर महिन्यात अशा तपास बंद केल्या गेलेल्या प्रकरणांची यादी तपास बंद केल्याच्या कारणांसह वेबसाईटवर ठेवली जाईल. अशा कोणत्याही तपास बंद केलेल्या प्रकरणाची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला उपलब्ध करून दिली जाईल.

या तक्रारीत जर गैरवर्तन किंवा भ्रष्टाचार या संदर्भातील सत्यता पडताळून पाहाण्याजोगी, विशिष्ट माहिती असेल, तर ती तक्रार निनावी असली तरीही ती फेटाळली जाणार नाही.

तक्रारकर्त्याच्या हेतूविषयी प्रश्न निर्माण करून कोणताही आरोप असलेली तक्रार फेटाळली जाणार नाही.

लोकपालसमोर होणाऱ्या सर्व सुनावण्यांच्या कामकाजाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाईल. या रेकॉर्डिंगच्या प्रतीची किमत भरल्यानंतर कोणालाही ते उपलब्ध होऊ शकेल.

ब) तक्रारीची प्राथमिक चौकशी करण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे असेल. एकूण परिस्थितीचा विचार करता लोकपालला या प्रकरणात संबंधित लोकसेवकाचे म्हणणे ऐकण्याची गरज वाटली तर तो ते ऐकून घेईल. तक्रार मिळाल्यापासून महिन्याच्या आत प्राथमिक चौकशी पूर्ण करून या तक्रारीचे कामकाज बंद करायचे की तपासाचे कामकाज पुढे सुरू ठेवायचे याविषयीचा निर्णय घेतला जाईल.

ळळ) लोकपालाने थेट किंवा प्राथमिक चौकशीअंती तपास सुरू करण्याचा निर्णय घेतला तर तो

अ) त्याला योग्य वाटल्यास तपासाशी संबंधित कागदपत्रे सेफ कस्टडीत ठेवण्याचा आदेश तो देऊ शकेल.

ब) तपासाच्या योग्य टप्प्यावर किंवा अखेरीस तक्रारीची प्रत, तपासाअंती काढलेले निष्कर्ष, तसेच ज्या माहिती किंवा पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढले गेले त्या सर्व तपशीलांची प्रत लोकसेवक आणि तक्रारकर्ता या दोघांनाही लोकपाल पाठवून देईल.

क) संबंधित लोकसेवक आणि तक्रारकर्ता या दोघांनाही त्यांचे म्हणणे मांडण्याची आणि ते ऐकून घेतले जाण्याची संधी दिली जाईल. ही सुनावणीही जाहीरपणे केली जाईल. काही अपवादात्मक परिस्थितीत लेखी नोंदी ठेवून ‘इन कॅमेरा’ कामकाज चालेल.

ळळळ) एखाद्या लोकसेवकाची एखादी कृती किंवा कारवाई याविरुद्ध सुरू असलेल्या तपासाचा परिणाम तपासाशी संबंधित असलेल्या कोणत्याही गोष्टींसंदर्भात दुसऱ्या लोकसेवकाने केलेली कोणतीही कृती किंवा त्याचे अधिकार अगर कर्तव्ये यावर होणार नाही.

ळीं) या कायद्याअंतर्गत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या किंवा तपासाच्या दरम्यान, आरोप किंवा गाऱ्हाणे पूर्णपणे किंवा अंशतः समाधानकारक असल्याची लोकपालाची खात्री झाली तर तो अंतरिम आदेशाच्या साहाय्याने संबंधित लोकसेवकाला संबंधित निर्णयाची अंमलबजावणी स्थगित ठेवण्याचे किंवा कृती थांबविण्याचे निर्देश देऊ शकतो किंवा होणारे अतिरिक्त नुकसान टाळण्यासाठी त्याने आदेशात नमूद केलेल्या काही नियम आणि अटींवर काही सक्तीचे किंवा प्रतिबंधक उपाय योजण्यासही सांगू शकतो.

ीं) तपासादरम्यान लोकपालाला प्रकरणाचे कामकाज सुरू केले पाहिजे असे वाटेल त्यावेळी किंवा तपास संपून कामकाज सुरू होण्याच्या दरम्यान

लोकपाल सर्व आरोपींच्या हलवण्याजोग्या आणि न हलविण्याजोग्या मालमत्तांची यादी तयार करेल आणि ती जाहीर करेल. एकदा ही यादी जाहीर झाली, की संबंधित मालमत्तेच्या स्थलांतरास परवानगी दिली जाणार नाही. अंतिम निर्णयाच्यावेळी संबंधित मालमत्तेचे काही नुकसान झाले आहे का याचा शोध घेऊन त्याची भरपाई करून घेण्याचे अधिकार या कायद्याच्या सेक्शन १९ अंतर्गत न्यायालयाला असतील. याशिवाय अन्य आदेशही दिले जातील.

ींळ) तक्रारीनुसार तपास किंवा चौकशी सुरू असताना संबंधित लोकसेवकाच्या पदामुळे या तपासावर किंवा चौकशीवर विपरीत परिणाम होऊ शकेल किंवा संबंधित लोकसेवकाच्या प्रभावामुळे पुरावा किंवा साक्षीदार यांच्यावर विपरीत परिणाम होऊ शकेल, असे लोकपालाला वाटल्यास त्या लोकसेवकाची दुसरीकडे बदली करणे किंवा त्याला त्या पदाऐवजी दुसरे पद देणे किंवा त्याला निलंबित करणे यापैकी कोणताही योग्य आदेश लोकपाल देऊ शकेल. फक्त असे आदेश पंतप्रधानांविरुद्ध काढता येणार नाहीत.

ींळळ) लोकसेवकाच्या एखाद्या निर्णयामुळे किंवा कृतीमुळे तक्रारकर्त्याचे नुकसान झाले आहे किंवा त्याच्यावर अन्याय झाला आहे किंवा त्याला त्रास सोसावा लागला आहे, असे प्राथमिक चौकशी किंवा तपासादरम्यान, लोकपालाच्या निदर्शनास आले, तर अशा गाऱ्हाण्यांसंदर्भात अंतरिम दिलासा म्हणून तक्रारकर्त्याला काही रक्कम देण्याची शिफारस करणारे आदेश लोकपाल योग्य अधिकाऱ्याला देऊ शकेल.

ींळळळ) या कायद्याअंतर्गत सुरू असलेल्या चौकशीच्या किंवा तपासाच्या दरम्यान कोणत्याही टप्प्यावर लोकपाल अंतरिम आदेश काढून योग्य अधिकाऱ्याला आवश्यक निर्णय घेण्याचे निर्देश देऊ शकेल. यात सरकारी कर्मचाऱ्याच्या निलंबनाचाही समावेश असू शकेल. असे आणखी काही निर्णय खालीलप्रमाणे असू शकतील.

ळ) लोकसेवकाच्या प्रशासकीय निर्णयामुळे किंवा कृतीमुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा सार्वजनिक उत्पन्नाचा अपव्यय किंवा संरक्षण यंत्रणेचे नुकसान होत असेल, तर ते रोखणे.

ळळ) लोकसेवकाच्या त्यापुढील आणखी गैरवर्तनास आळा घालणे.

ळळळ) लोकसेवकाने भ्रष्टाचारी मार्गाने मालमत्ता मिळविल्याचा त्याच्यावर आरोप असेल, तर संबंधित मालमत्ता लपवून ठेवण्यास त्याला प्रतिबंध करणे.

ळु) तक्रारीचा तपास पूर्ण झाल्यावर संबंधित लोकसेवकावर केल्या गेलेल्या आरोपात तथ्य आढळल्यास आणि त्यामुळे तो लोकसेवक आपल्या पदावर काम करण्यास अपात्र असून त्याने आपल्या पदावरून दूर व्हावे, असे लोकपालास वाटल्यास लोकपाल तशा प्रकारचे आदेश संमत करू शकतो. हा लोकसेवक जर मंत्री असेल, तर लोकपाल आपली ही शिफारस राष्ट्रपतींकडे पाठवून देईल. त्यानंतर राष्ट्रपती ही शिफारस स्वीकारायची की फेटाळायची याविषयीचा निर्णय शिफारस मिळाल्यापासून महिन्याच्या आत घेतील. या सेक्शनमधील तरतुदी पंतप्रधानांना लागू होणार नाहीत.

ु) गाऱ्हाण्याच्या किंवा तक्रारीच्या चौकशीनंतर आणि उभय पक्षांना आपापल्या बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर लोकपालना जर खटला पुढे चालविणे योग्य आहे असे वाटले, तर –

ळ) तक्रारकर्त्याची तक्रार आदेशात नमूद केलेल्या वेळेत आणि पद्धतीने दूर करण्यासाठी लोकपाल योग्य अधिकाऱ्यांना आदेश देईल.
ळळ) दोषी अधिकाऱ्यांच्या वेतनातून लोकपालने आदेशात नमूद केलेल्या रकमेची कपात करण्याचे आदेश लोकपाल योग्य अधिकाऱ्याला देईल. ही रक्कम विलंब झालेल्या प्रत्येक दिवसासाठी अडीचशे रुपयांपेक्षा कमी नसेल. नागरिकांच्या सनदेत तक्रार दूर करण्यासाठी दिलेली वेळेची मुदत ज्या दिवशी संपेल, त्या दिवसापासून हा विलंब मोजण्यात येईल. .

ळळळ) आदेशात नमूद केलेली रक्कम तक्रारदाराला भरपाई म्हणून देण्याचे निर्देशही लोकपाल योग्य अधिकाऱ्याला देईल. कोणत्याही गाऱ्हाण्यावर ते मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत निर्णय झाला पाहिजे. जर संबंधित तक्रार अर्जदाराच्या जीवित किंवा स्वातंत्र्याशी संबंधित असेल आणि तातडीने लक्ष घालण्याजोगी असेल आणि लोकपालाची ती तातडीने लक्ष घालण्याजोगी असल्याची खात्री झाली, तर अशी तक्रार ४८ तासांच्या आत निकालात काढली जाईल.
ुळ) लोकपालकडच्या सर्व नोंदी आणि माहिती ही सार्वजनिक स्वरूपाची असेल. माहितीच्या अधिकाराखाली मागवली गेलेली कोणतीही माहिती किंवा नोंदी संबंधिताला उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. एखाद्या प्रकरणाची चौकशी किंवा तपास सुरू असेल आणि त्या प्रकरणाच्या चौकशीवर किंवा तपासावर संबंधित माहिती दिल्यामुळे विपरीत परिणाम होण्याची शक्यता नसेल, तर अशा प्रकरणातील संबंधिताला हवी असलेली माहितीही लोकपाल चौकशी किंवा तपास सुरू असतानाच देईल.
चौकशी किंवा तपास पूर्ण झाल्यावर मात्र कोणत्याही प्रकारची कोणतीही माहिती माहितीच्या अधिकाराखाली देण्यासाठी राखून ठेवता येणार नाही.

सरकारी नुकसानीची वसुली आणि शिक्षा

१९) भ्रष्टाचारविरोधी कायद्याखाली एखादी व्यक्ती दोषी असल्याचे आढळून आल्यास ट्रायल कोर्ट सरकारला झालेल्या नुकसानीची मोजदाद करेल आणि ज्यांच्याकडून ही रक्कम लँड रेव्हेन्यूची बाकी म्हणून वसूल केली गेली पाहिजे अशा विविध दोषी व्यक्तीकडून ती रक्कम वसूल केली जाईल.
१९ अ) गुन्ह्यांसाठी शिक्षा : भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील तिसऱ्या चाप्टरमध्ये नमूद केलेल्या गुन्ह्यांसाठी किमान पाच वर्षांपासून जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षा होऊ शकतात. त्यातही जर दोषी व्यक्ती राज्याच्या संयुक्त सचिवाच्या (जॉइंट सेक्रेटरी), किंवा त्याहून वरिष्ठ दर्जाची असेल किंवा मंत्री असेल तर किमान शिक्षा ही दहा वर्षांची असेल. या कायद्याच्या सेक्शन २ (४) मधील तरतुदींमध्ये नमूद केलेल्या प्रकारचा गुन्हा जर असेल आणि कोणत्याही उद्योग व्यवसायाने सरकारी रकमेचा उपभोग घेतला असेल, तर या कायद्यात आणि भ्रष्टाचारविरोधी कायद्यात नमूद केलेल्या अन्य शिक्षांव्यतिरिक्त सरकारला झालेल्या नुकसानीच्या रकमेच्या पाचपट रकमेचा दंड त्यांच्यावर आकारला जाईल. संबंधित दोषी व्यक्तीची स्वतःची मालमत्ता दंडाच्या तुलनेत कमी असेल, तर दंडाची वसुली कंपनीच्या मालमत्तेतून आणि कंपनीच्या सर्व संचालकांच्या वैयक्तिक मालमत्तेतून केली जाईल.

तक्रारकर्त्यांना संरक्षण
२०. १) तक्रारकर्ता जर शारीरिक किंवा व्यावसायिक त्रासाला बळी पडत असेल, तर आपल्याला शारीरिक किंवा व्यावसायिक त्रासापासून संरक्षण देण्याची मागणी तक्रारकर्ता लोकपालांकडे लेखी स्वरूपात करू शकेल.
२) अशी तक्रार मिळाल्यावर लोकपाल खालील प्रकारे कारवाई सुरू करतील.
अ) व्यावसायिक बळी ठरण्याची धमकी : लोकपाल योग्य चौकशी करेल आणि जर त्यातून त्या व्यक्तीला खरोखरच धोका असल्याचे निदर्शनास आले आणि त्या व्यक्तीने या कायद्याखाली तक्रारीत नमूद केल्याप्रमाणेच ती त्रस्त आहे, याची खात्री

पटली, तर शक्य तितक्या लवकर लोकपाल योग्य ते सर्व आदेश संमत करेल. तक्रार मिळाल्यापासून महिन्याभराच्या आत हे सर्व आदेश काढले जातील. योग्य अधिकाऱ्यांना लोकपालांनी निर्देश दिल्याप्रमाणे या प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले जातील.

ब)या कायद्याखाली तक्रार केल्यामुळे आपल्याला आधीच व्यावसायिकरित्या त्रास दिला गेल्याची या तक्रारकर्त्याची तक्रार असेल, तर या प्रकरणाची चौकशी केली जाईल. त्यानंतर खरोखरच या प्रकरणामुळे संबंधिताचा व्यावसायिक बळी दिला गेल्याचे लोकपालाच्या निदर्शनास आले, तर याही प्रकरणात लोकपाल शक्य तितक्या लवकर संबंधित अधिकाऱ्यांना लोकपालाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश देईल. या प्रकरणातही तक्रार मिळाल्यापासून आदेश काढण्यासाठी महिन्याहून अधिक कालावधी घेतला जाणार नाही.

२० १) साठी लोकपाल कदाचित पुढील कारवाई करूही शकेल. पण २० २) साठी लोकपाल पुढील कारवाई करेलच. सीसीएस कंडक्ट रुल्स अंतर्गत ज्या अधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्यांनी तक्रारकर्त्याला तशी धमकी दिली असेल किंवा त्रास दिला असेल त्याच्यावर दंड आकारला जाईल. या प्रकरणी या अधिकाऱ्याला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतरच असा दंड आकारला जाईल.

क) शारीरिक त्रासाचा बळी ठरण्याची धमकी : या प्रकरणीही लोकपाल योग्य चौकशी करेल. त्यानंतर त्या व्यक्तीला या कायद्याखाली तक्रार केल्यामुळे किंवा आरटीआय अर्ज भरल्यामुळे खरोखरच हा धोका असल्याची त्याची खात्री झाली, तर दुसऱ्या एखाद्या कायद्यात याविषयी काय म्हटले आहे, याचा विचार न करता लोकपाल शक्य तेवढ्या लवकर योग्य आदेश संमत करेल. मात्र हे आदेश काढण्यासाठी एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधी लागणार नाही. या प्रकरणी पोलिसांसह योग्य अधिकाऱ्यांना आदेश दिले जातील. संबंधित व्यक्तीला योग्य संरक्षण पुरविण्यासाठी आदेशात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले जातील. धमकी देणाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि अशा प्रकारचा धोका कमी करणारे वातावरण तयार करण्यासाठी आवश्यक कारवाई करण्याचे आदेशही संबंधितांना दिले जातील.

जर हा धोका अगदी नजीकच्या काळात असल्याचे लोकपालच्या निदर्शनास आले, तर अशा परिस्थितीत अवघ्या काही तासांतच तातडीने शारीरिक छळ रोखण्यासाठी लोकपाल निर्णय घेईल.

ड) या कायद्याखाली तक्रार केल्यामुळे आपण आधीच शारीरिक छळाचे बळी ठरलो असल्याचे जर तक्रारकर्त्याने तक्रारीत म्हटले असेल, आणि चौकशीअंती या तक्रारीत तथ्य असल्याचे लोकपालाच्या निदर्शनास आले, तर अन्य कायद्यांतील तरतुदींचा विचार न करता लोकपाल या शारिरिक छळाला प्रतिबंध करण्यासाठी शक्य तितक्या लवकर यासंबंधीचे आदेश काढेल. हे आदेश काढण्यासाठी तक्रार मिळाल्यापासून २४ तासांपेक्षा अधिक कालावधी घेतला जाणार नाही. योग्य अधिकाऱ्यांना या प्रकरणी संबंधित तक्रारकर्त्याला संरक्षण देण्यासाठी लोकपालाने आदेशात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले जातील. दोषी व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे, तसेच तक्रारकर्त्याला अधिक त्रास होऊ नये याची हमी मिळण्यासाठी कारवाई करण्याचे आदेशही दिले जातील.

इ)आरोपींना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली शिक्षा होण्याजोगा आरोप जर तक्रारकर्त्याने केला असेल, तर क) अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांमध्ये लोकपाल कदाचित पुढील कारवाई करू शकेल. पण ड) अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांमध्ये तो ही कारवाई करेलच.

तक्रारकर्त्याने केलेल्या तक्रारी खास टिमसमोर ठेवल्या जातील. त्यानंतर त्या तक्रारींचा तपास जलद गतीने केला जाईल. हा तपास महिन्याच्या आत पूर्ण केला जाईल.

फ) भ्रष्टाचारविरोधी कायद्याखाली येणाऱ्या आरोपांखेरीज अन्य प्रकारचे आरोप तक्रारकर्त्याने आरोपींवर केले असतील, तर क) अंतर्गत लोकपाल खालील कारवाई कदाचित करेलही; पण ड) खाली येणाऱ्या प्रकरणांमध्ये तो खालील कारवाई करेलच. ज्या यंत्रणेला (एजन्सीला) या आरोपांना लागू होणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार असतील, अशा यंत्रणेला लोकपाल याविषयीचे निर्देश देईल. खास टिमकडून या प्रकरणाचा तपासही जलद गतीने आणि तो लोकपालाने दिलेल्या कालावधीतच पूर्ण केला जाईल.

ग) फ खाली येणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत संबंधित योग्य यंत्रणांना निर्देश देण्याचे अधिकार लोकपालला असतील. या प्रकरणातील तपासकामावर देखरेख ठेवणे आणि आवश्यकता असेल तर लोकपालाने सांगितलेल्या पद्धतीनेच तपास करण्याचे निर्देशही संबंधित यंत्रणेला लोकपाल देईल.
३) जर एखाद्या तक्रारकर्त्याने आपले नाव गुप्त ठेवण्याची आणि ओळख उघड न करण्याची विनंती केली, तर लोकपाल ते मान्य करेल. अशा तक्रारकर्त्यांची तक्रार कशा प्रकारे हाताळावी याविषयीची तपशीलवार प्रक्रिया लोकपाल स्पष्ट करेल.
४) व्यक्तीच्या शारीरिक अगर व्यावसायिक छळाला प्रतिबंध व्हावा, म्हणून लोकपाल सार्वजनिक अधिकाऱ्यांना त्यांच्या धोरणांमध्ये आणि कामकाजात आवश्यक बदल करण्याचे आदेश देईल.

तक्रार निवारण यंत्रणा

२१) नागरिकांच्या सनदी : १) प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळ योग्य कालावधीत नागरिकांची सनद तयार करण्यास आणि तिची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असेल. हा कायदा लागू झाल्यापासून एक वर्षांच्या आत सनद तयार केली जाईल.
२)प्रत्येक नागरिकांच्या सनदेमध्ये संबंधित सार्वजनिक अधिकारी मंडळाच्या नागरिकांविषयीच्या जबाबदाऱ्या स्पष्ट केलेल्या असतील. त्याचप्रमाणे प्रत्येक जबाबदारी पूर्ण करण्यासाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याची माहिती दिलेली असेल. या जबाबदाऱ्या पूर्ण करावयाचा निश्चित कालावधीही नमूद केलेला असेल.
३) प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळ सार्वजनिक तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्ती करेल. नागरिकांच्या सनदीतील कोणत्याही वचनाचा भंग झाला तर कोणताही नागरिक त्या संदर्भात या अधिकाऱ्याकडे तक्रार दाखल करू शकेल.
४)प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळ नागरिकांच्या सनदेच्या कामकाजाचा वर्षातून किमान एकदा तरी आढावा घेईल आणि जनतेशी सल्लामसलत करून त्यात काही सुधारणाही करेल.
५) सार्वजनिक अधिकारी मंडळाला त्यांच्या नागरिकांच्या सनदेमध्ये बदल करण्याविषयी लोकपालही आदेश देऊ शकेल.
६) संबंधित सार्वजनिक अधिकारी मंडळाकडे तक्रारदाराने तक्रार करून १५ दिवस उलटून गेल्याशिवाय लोकपाल संबंधित तक्रारदाराची तक्रार दाखल करून घेणार नाही.
तक्रारीची तीव्रता किंवा तक्रार तातडीने दाखल करून घेण्याची गरज असल्यास आणि तसे लोकपालाला वाटल्यास लोकपाल अशी तक्रार लवकरही दाखल करून घेईल.

लोकपालचे नोकरदार, कर्मचारी आणि अधिकारी
२२) मुख्य देखरेख अधिकारी : १) प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळावर लोकपाल एका अधिकाऱ्याला निवडून त्याची मुख्य देखरेख अधिकारी म्हणून नियुक्ती करेल.
२) हा अधिकारी त्याच सार्वजनिक अधिकारी मंडळात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी नसेल.
३)हा अधिकारी भ्रष्टाचाराविरुद्ध कडक पावले उचलू शकणारा आणि निर्विवादपणे निष्ठावान व सक्षम असेल.
४) कोणत्याही सार्वजनिक अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल करून घेण्यास तो जबाबदार असेल आणि इतर सार्वजनिक अधिकारी मंडळांविषयीच्या तक्रारी त्याला प्राप्त झाल्यापासून दोन दिवसांच्या आत तो त्या संबंधित मंडळांकडे पाठवून देईल.
५) लोकपालने त्याला वेळोवेळी दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्यास तो जबाबदार असेल. लोकपालने वेळोवेळी घालून दिलेल्या पद्धतीनुसारच तो तक्रारी हाताळेल.
ज्या तक्रारींचा तपास भ्रष्टाचारविरोधी कायदा, १९८८ अंतर्गत होण्याची गरज असेल, त्या लोकपालच्या तपास विभागाकडे हस्तांतरित करण्यात येतील.

जॉइंट सेक्रेटरीच्या दर्जाच्या किंवा त्या वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याविरुद्धची गाऱ्हाणी किंवा तक्रारी यांचा तपास मुख्य देखरेख अधिकारी करणार नाही. या तक्रारी लोकपालकडे पाठवल्या जातील. लोकपाल या तक्रारींसंदर्भात तपास करण्यासाठी अन्य तीन सार्वजनिक अधिकारी मंडळांच्या मुख्य देखरेख अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करेल.
६) या कायद्याच्या सेक्शन २१ अंतर्गत नेमण्यात आलेल्या सार्वजनिक तक्रार निवारण अधिकाऱ्याकडून नागरिकाला समाधानकारक निर्णय मिळाला असे न वाटल्यास अशा सर्व तक्रारी मुख्य देखरेख अधिकाऱ्याकडे पाठविल्या जातील आणि लोकपालांच्या वतीने तो त्या मार्गी लावेल.
२३) लोकपालचे कर्मचारी वगैरे – १) या कायद्याखाली लोकपालची निश्चित करण्यात आलेली विविध कामे पूर्ण करण्यासाठी मदत करणारे अधिकारी आणि कर्मचारी नेमले जातील. २) सरकारशी सल्लामसलत करून लोकपाल विविध श्रेणींच्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचारी यांची संख्या निश्चित करेल. ३) उपविभाग १ अंतर्गत नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या श्रेणी, भरती आणि सेवा शर्ती यांच्यासाठी खास अटी, शर्ती असतील. त्यांना खास वेतनही दिले जाईल. त्यांनी निर्भयपणे आपले कार्य करावे यासाठी ही तरतूद केली जाईल. लोकपालच्या शिफारशींनुसार ते निश्चित केले जाईल.
ज्याच्या निष्ठेविषयी शंका असेल, असा अधिकारी लोकपालमध्ये नियुक्त होऊ शकणार नाही. लोकपालमध्ये बदली कर्मचारी किंवा अधिकारी म्हणून काम करणाऱ्या सर्वांनाही याच सेवाशर्ती आणि अटी लागू होतील.
४)उपविभाग १ मधील तरतुदींविषयी कोणतेही पूर्वग्रह न बाळगता लोकपाल तपासकामासाठी या कायद्याअंतर्गत अन्य काही जणांच्या सेवाही घेऊ शकेल. त्या अशा असतील.
अ) कोणताही अधिकारी किंवा केंद्र सरकारची कोणतीही तपास यंत्रणा. किंवा
ब) कोणताही अधिकारी किंवा अन्य कोणत्याही सरकारच्या पूर्वपरवानगीने त्यांची तपास यंत्रणा. किंवा
क)कोणतीही व्यक्ती किंवा कोणतीही यंत्रणा
५) उपविभाग १ मध्ये संदर्भ दिला गेलेले अधिकारी किंवा कर्मचारी लोकपालच्या प्रशासकीय आणि शिस्तविषयक नियंत्रणाखाली असतील.
६) आपल्या अधिकाऱ्यांची निवड करण्याचा लोकपालला अधिकार असेल. लोकपाल इतर सरकारी यंत्रणांमधून डेप्युटेशनवरच्या अधिकाऱ्यांची निवड करेल. ठराविक मुदतीसाठी किंवा कायमस्वरूपी कर्मचारीही लोकपाल अशा पद्धतीने भरती करून घेईल किंवा बाहेरून कायमस्वरूपी किंवा ठराविक मुदतीवर नेमण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची तो भरती करून घेईल.
७) लोकपालच्या कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना केंद्र सरकारच्या अन्य कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना मिळणारी वेतनश्रेणी आणि भत्ते यापेक्षा वेगळी आणि अधिक वेतन असलेली वेतनश्रेणी आणि अधिक भत्ते मिळतील. ही वेतनश्रेणी आणि भत्ते पंतप्रधानांशी चर्चा करून लोकपाल वेळोवेळी ठरवेल. त्यामुळें लोकपालमध्ये काम करण्याकडे प्रामाणिक आणि सक्षम लोक आकर्षित होतील.
२४) रद्दबातल ठरवणे आणि बचत करणे १) केंद्रीय देखरेख आयोग कायदा रद्दबातल ठरवला जाईल. २)केंद्रीय देखरेख आयोग कायदा  रद्दबातल ठरविला गेल्यानंतर, या कायद्याअंतर्गत केलेली कोणतीही कृती किंवा गोष्ट यापुढे  लोकपालशी संबंधित या कायद्याखाली केली गेल्याचे समजले जाईल आणि या कायद्याच्या संबंधित तरतुदींखाली या कृती किंवा गोष्टींचे कामकाज पुढे सुरू ठेवले जाईल किंवा पूर्ण केले जाईल. ३) केंद्रीय देखरेख आयोगासमोर प्रलंबित असलेल्या सर्व चौकशा आणि तपास आणि जी प्रकरणे निर्गत झालेली नाहीत अशी सर्व प्रकरणे लोकपालकडे हस्तांतरित केली जातील. या प्रकरणांची सुनावणी आणि कामकाज लोकपालकडून केले जाईल. या प्रकरणाची सुरुवातीची सुनावणीही जणू काही लोकपालसमोरच झाली होती, असे समजून त्यापुढील कामकाज केले जाईल. ४) अन्य कोणत्याही कायद्यात काय म्हटले आहे याची दखल न घेता केंद्रीय देखरेख आयोगाचे सचिव आणि अन्य अधिकारी, तसेच कर्मचारी यांची पदे रद्दबातल ठरवली जातील. या सचिव, अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती यापुढे लोकपालचे सचिव, अधिकारी आणि कर्मचारी

म्हणून केली जाईल. त्यांचे वेतन, भत्ते आणि सेवा शर्ती व अटी यांच्यात जोपर्यंत लोकपालमध्ये नियुक्ती झाल्यानंतर बदल केला जाणार नाही, तोपर्यंत त्यांच्या पूर्वीच्या नियुक्तीप्रमाणेच या सर्व गोष्टी त्यांना मिळतील. ५) केंद्र सरकारच्या सर्व विभागांच्या नियंत्रणाखाली असलेले सर्व देखरेख प्रशासन, केंद्र सरकारची सर्व मंत्रिमंडळे, केंद्राच्या कोणत्याही कायद्याखाली स्थापन झालेल्या महापालिका, सरकारी कंपन्या, सोसायट्या आणि केंद्राच्या मालकीची किंवा केंद्राच्या अधिपत्याखालील स्थानिक अधिकारी मंडळे त्यांचे कर्मचारी, मालमत्ता आणि त्यांच्या बांधिलकी यांच्यासह लोकपालकडे हस्तांतरित केली जातील. ६) उपविभाग ५ मध्ये नमूद केलेल्या यंत्रणांच्या देखरेख विभागात काम करणारे कर्मचारी लोकपालकडे त्यांचे हस्तांतरण झाल्याच्या तारखेपासून लोकपालमध्ये पाच वर्षांच्या डेप्युटेशनवर असल्याचे समजले जाईल. मात्र लोकपाल त्यांच्यापैकी कोणालाही केव्हाही परत पाठविण्याचा निर्णय घेऊ शकेल. ७) उपविभाग ५ अंतर्गत लोकपालकडे एखाद्या विभागातील हस्तांतरित झालेल्या कर्मचाऱ्यांवर त्या विभागाचे प्रशासकीय किंवा कामकाजाच्या दृष्टीने कसलेही नियंत्रण राहाणार नाही.

८) प्रत्येक विभागाच्या देखरेख विभागात लोकपाल कर्मचाऱ्यांना अशा प्रकारे फिरते ठेवून देखरेख विभाग तयार करेल, की त्यामुळे त्याच विभागातील कर्मचारी त्याच विभागाच्या देखरेख विभागात नसतील.

९) ज्या कर्मचाऱ्याची देखरेख संदर्भातील चौकशी सुरू असेल किंवा प्रलंबित असेल किंवा ज्याच्यावरचा फौजदारी खटला, लोकपालमधील त्याच्या नियुक्तीच्या दरम्यान प्रलंबित असेल, असा कर्मचारी लोकपालमध्ये काम करू शकणार नाही.

२५) लोकपालचा तपास विभाग : १) लोकपालमध्ये एक तपास विभाग असेल. २) भ्रष्टाचारविरोधी कायद्याच्या सेक्शन १७ मध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबींचा विचार न करता या कायद्याखाली केल्या जाणाऱ्या तक्रारींसाठी लोकपाल ठरवेल, त्या पातळीपर्यंतच्या तपास विभागातील अधिकाऱ्यांना, तपास आणि देशभरातील व्यक्तींना अटक करण्यासंदर्भात, दिल्ली स्पेशल पोलीस एस्टॅब्लिशमेंटमधील सदस्यांना त्यांच्या अखत्यारीतील गुन्ह्यांच्या तपासासाठी असलेल्या अधिकार, कर्तव्ये, बांधिलकी आणि हक्कांप्रमाणे अधिकार, कर्तव्ये, बांधिलकी आणि हक्क मिळतील. ३)भ्रष्टाचारविरोधी कायदा, १९८८ अंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांचा तपास आणि पुढील कामकाज पाहणारा दिल्ली स्पेशल पोलीस एस्टॅब्लिशमेंटचा संपूर्ण भाग त्यातील कर्मचारी, या भागाची मालमत्ता आणि बांधिलकी यांच्यासह लोकपालकडे हस्तांतरित होईल.

४) दिल्ली स्पेशल पोलीस एस्टॅब्लिशमेंटचा जो भाग उपविभाग ३ खाली लोकपालकडे हस्तांतरित केला जाईल., तो भाग लोकपालच्या तपास विभागाचा एक भाग बनेल.

५) या हस्तांतरित झालेल्या भागावर आणि त्यातील कर्मचाऱ्यांवर केंद्र सरकारचे कोणतेही नियंत्रण उरणार नाही.

६)उपविभाग ३ अंतर्गत हस्तांतरित झालेल्या या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते आणि त्यांच्यासाठीच्या अन्य सेवा शर्ती व अटी या हा कायदा लागू होण्याच्या अगदी नजीकच्या काळातील त्यांच्या वेतन, भत्ते आणि सेवाशर्ती व अटींप्रमाणेच असतील.

७) उपविभाग ३ अंतर्गत लोकपालकडे हस्तांतरित झालेल्या दिल्ली स्पेशल पोलीस एस्टॅब्लिशमेंटच्या भागाकडे असलेली सर्व प्रकरणे लोकपालकडे हस्तांतरित होतील.

८) कोणत्याही प्रकरणाचा तपास पूर्ण झाला, की तपास विभाग ते प्रकरण लोकपालच्या योग्य त्या खंडपीठासमोर सादर करेल. हे खंडपीठ संबंधित प्रकरणी खटला चालविण्यास परवानगी दिली जावी की नाही याविषयी निर्णय घेईल.

२६) लोकपालच्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांविरुद्धच्या तक्रारी : १) लोकपालच्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्धच्या तक्रारींबाबत या सेक्शनच्या तरतुदींनुसार स्वतंत्रपणे कामकाज केले जाईल. २)भ्रष्टाचारविरोधी कायद्यांतर्गत शिक्षा होण्याजोगा गुन्हा किंवा गैरवर्तन किंवा अप्रामाणिक चौकशी किंवा तपास या संदर्भातील आरोपांवर आधारित या तक्रारी असू शकतात. ३)अशा प्रकारची तक्रार आल्याबरोबर तिच्या सर्व तपशीलांसह लगेच ती लोकपालच्या वेबसाईटवर ठेवली जाईल. ४) अशा प्रकारच्या प्रत्येक तक्रारीविषयीचा तपास तक्रार दाखल झाल्यापासून महिन्याच्या आत पूर्ण केला जाईल. ५) संबंधित अधिकाऱ्यावर केल्या गेलेल्या आरोपासंदर्भात त्याची तपासणी केली जाईलच; शिवाय भारतीय दंड विधानाच्या सेक्शन १०७, १६६, १६७, १७७, १८२, १९१, १९२, १९६, १९९, २००, २०१, २०२, २०४, २१७, २१८, २१९, ४६३, ४६४, ४६८, ४६९, ४७०, ४७१, ४७४ खालीही या आरोपांचा तपास केला जाईल. ६) तपासादरम्यान, जर

लोकपालला या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे आढळले, तर या अधिकाऱ्याकडच्या सर्व जबाबदाऱ्या आणि अधिकार लोकपाल काढून घेईल आणि त्या अधिकाऱ्याला निलंबित केले जाईल. ७) चौकशीचे किंवा तपासाचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ खाली खटला चालवायचा की एखाद्या गैरवर्तनाबद्दल त्याला अपराधी समजायचे की अप्रामाणिकपणे चौकशी किंवा तपास केल्याबद्दल त्याला दोषी धरायचे याविषयीचा निर्णय लोकपाल घेईल. त्यानंतर त्या व्यक्तीला लोकपालमध्ये काम करता येणार नाही. ती व्यक्ती जर लोकपालची कर्मचारी असेल, तर लोकपाल त्या व्यक्तीला एक तर कामावरून काढून टाकेल किंवा तो डेप्युटेशनवर असेल, तर त्याला परत पाठवून देईल. संबंधित दोषी व्यक्तीला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय मात्र या संदर्भातील आदेश काढले जाणार नाहीत. या कलमाखालील आदेश हा तपास पूर्ण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत संमत करण्यात येईल.
८) लोकपालचे अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्धच्या तक्रारी हाताळण्यासाठी लोकपालमध्ये स्वतंत्र विभाग असेल.
९) लोकपालमधील कर्मचारी आणि अधिकारी यांच्याविरुद्धच्या तक्रारींची चौकशी आणि तपास यांचे काम अत्यंत पारदर्शीपणे आणि प्रामाणिकपणे व्हावे, याची प्रत्येक टप्प्यावर लोकपालकडून विशेष काळजी घेतली जाईल.
२७) संरक्षण : १) या कायद्याखाली आपले कार्यालयीन कर्तव्य पार पाडत असताना सद्भावनेने केलेल्या कोणत्याही गोष्टीपोटी किंवा त्या गोष्टीतून अगर कृतीतून निर्माण झालेल्या आशयापोटी सेक्शन १४ (४) मध्ये उल्लेख केलेल्या अध्यक्ष किंवा सदस्य किंवा कोणताही अधिकारी, कर्मचारी, यंत्रणा किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारचा खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई करता  येणार नाही.
२) लोकपालचे कोणतेही कामकाज वरवरच्या भूमिकेतून वाईट ठरवता येणार नाही. लोकपालचे कोणतेही कामकाज किंवा निर्णय याला कोणत्याही सर्वसामान्य सिव्हिल न्यायालयात आव्हान देता येणार नाही किंवा त्याचा आढावा घेता येणार नाही किंवा तो निर्णय रद्दबातल ठरवता येणार नाही किंवा त्याबाबत हरकतही घेता येणार नाही.

संकीर्ण
२८) लोकसेवकांनी मालमत्तेची यादी सादर करावी.
१) सेक्शन २ (११) अ ते क मध्ये नमूद केलेल्यांव्यतिरिक्त प्रत्येक लोकसेवक हा कायदा लागू झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत आणि त्यानंतर दरवर्षी तीस जूनपूर्वी संबंधित सार्वजनिक अधिकारी मंडळाच्या प्रमुखाकडे लोकपालाने ठरवून दिलेल्या नमुन्यात आपली मालमत्ता आणि बांधिलकी आणि आपल्या कुटुंबातील सदस्य यांची माहिती सादर करेल. सेक्शन २ (११) च्या अ ते क मध्ये नमूद केलेले लोकसेवक लोकपालाने ठरवून दिलेल्या नमुन्यात अन्य लोक सेवकांप्रमाणेच त्याच तारखेला लोकपालाकडे आपली संबंधित माहिती सादर करतील.
२) प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळाचा प्रमुख दरवर्षी ३१ ऑगस्टपर्यंत त्यांच्याकडे आलेल्या सर्व लोकसेवकांच्या मालमत्तेची संपूर्ण माहिती वेबसाईटवर ठेवेल.
३) जर सार्वजनिक अधिकारी मंडळाच्या प्रमुखाला एखाद्या लोकसेवकाकडून अशा प्रकारची माहिती वेळेवर उपलब्ध झाली नाही, तर हा प्रमुख त्या संबंधित लोकसेवकाला आपल्या मालमत्तेची माहिती त्वरित देण्यास सांगेल. त्यानंतरही संबंधित लोकसेवकाने पुढच्या महिन्याभरात ही माहिती ठराविक नमुन्यात सादर केली नाही, तर तो प्रमुख संबंधित लोकसेवकाने ही माहिती सादर करेपर्यंत त्याचे वेतन आणि भत्ते रोखून धरेल.
स्पष्टीकरण : या सेक्शनमध्ये उल्लेख केलेले लोकसेवकाचे कुटुंब म्हणजे त्याचा जोडीदार, त्याची मुले आणि त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे पालक.
४) अशा लोकसेवकाविरुद्ध लोकपाल भारतीय दंड संविधानाच्या सेक्शन १७६ खाली खटला भरू शकेल.
५) कोणत्याही लोकसेवकाने दिलेली माहिती चुकीची असल्याचे आढळले, तर लोकपाल या कायद्याच्या इतर सेक्शनखाली अशा लोकसेवकावर कारवाई करण्याशिवाय त्या लोकसेवकाच्या निष्पन्न झालेल्या अतिरिक्त मालमत्तेच्या किमतीच्या जास्तीत

जास्त निम्म्याएवढी रक्कम दंड म्हणून त्याच्यावर आकारू शकेल. याशिवाय  लोकपाल या अतिरिक्त मालमत्तेविषयीची माहिती प्राप्तीकर विभागाकडे योग्य कारवाईसाठी पाठवून देईल.
२९) अधिकार सुपूर्द करणे आणि कामे सोपविणे : १) लोकपालमध्ये काम करत असलेल्या अधिकाऱ्यांकडे आपल्याकडचे अधिकार सुपूर्द करणे आणि त्यांच्यावर विविध कामांची जबाबदारी सोपविणे ही कामे करण्यास लोकपाल समर्थ असेल.
२)या अधिकाऱ्यांनी पार पाडलेल्या विविध कामांच्या जबाबदाऱ्या आणि वापरलेले अधिकार हे लोकपालने पार पाडलेल्या जबाबदाऱ्या आणि अधिकार आहेत, असेच समजले जाईल.
खाली दिलेली कार्ये मात्र फक्त खंडपीठानेच पार पाडावयाची असून ती कोणावरही सोपविता येणार नाहीत.
ळ) कोणत्याही प्रकरणी खटला चालविण्यासाठी परवानगी देणे.
ळळ) सीसीएस कंडक्ट रुल्सअंतर्गत कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला काढून टाकणे.
ळळळ) लोकपालच्या अधिकारी अगर कर्मचाऱ्यांविरुद्धच्या तक्रारींविषयीचे सेक्शन १० मध्ये नमूद केलेले आदेश संमत करणे.
ळीं) जॉइंट सेक्रेटरी किंवा त्याहून वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांविरुद्धच्या गाऱ्हाणे वगळता अन्य तक्रारींविषयीचे आदेश संमत करणे.

३०) काल मर्यादा : १) तक्रार मिळाल्यापासून महिन्याच्या आत या कायद्याच्या सेक्शन ९ मधील उपविभाग १ अंतर्गत केली जाणारी प्राथमिक चौकशी पूर्ण केली जावी. ठराविक कालमर्यादेत ही चौकशी पूर्ण झाली नाही, तर त्याविषयी स्पष्टीकरण देण्यास चौकशी अधिकारी जबाबदार असेल. २) कोणत्याही आरोपासंदर्भातील तपासाचे काम सहा महिन्यांच्या आत पूर्ण केले गेले पाहिजे. तक्रार मिळाल्यापासून वर्षभराच्या कालमर्यादेपेक्षा अधिक काळ त्या प्रकरणाचे काम चालणार नाही.
३)कोणत्याही प्रकरणी लोकपालने दाखल केलेल्या ट्रायलचे कामकाज एक वर्षाच्या आत पूर्ण झाले पाहिजे. अपवादात्मक परिस्थितीत हे कामकाज तहकूबही केले जाऊ शकेल.
३१) बनावट तक्रारींसाठी शिक्षा : १) या कायद्यांतर्गत कोणीही खोटी किंवा पोरकटपणाने ‘छचोर’ या प्रकारात मोडणारी तक्रार केली, तर लोकपालांना योग्य वाटल्यास त्या तक्रारकर्त्याला ते दंडाची शिक्षा ठोठावू शकतील. तक्रारकर्त्याचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय मात्र अशा प्रकारच्या दंडाचा निर्णय संमत केला जाणार नाही. २) जमीन उत्पन्न कायद्याखालील (लँड रेव्हेन्यू ॲक्ट) थकबाकी म्हणून अशा प्रकारच्या दंडांची वसुली केली जाईल. ३) या कायद्याखाली एकदा केलेली तक्रार किंवा आरोप मागे घेता येणार नाही.

३१ अ) प्रतिबंधात्मक उपाय : १)आपल्या न्यायालयीन क्षेत्रात येणाऱ्या सर्व सार्वजनिक अधिकारी मंडळांच्या कामकाजाचा लोकपाल नियमितपणे ठराविक काळानंतर अभ्यास करेल आणि भविष्यात भ्रष्टाचाराला प्रतिबंध व्हावा, यासाठी संबंधित सार्वजनिक अधिकारी मंडळांशी सल्लामसलत करून मंडळाला काही निर्देश देईल.
२) या कायद्याविषयी जनजागृती करण्याची, तसेच भ्रष्टाचार नष्ट करणे आणि प्रशासनातील गैरप्रकार दूर करणे यासाठी सर्वसामान्य नागरिकांना या कामात सहभागी करून घेण्याची जबाबदारी लोकपालावर असेल.

३२ नियम करण्याचे अधिकार : १) या कायद्यातील तरतुदी प्रत्यक्षात वापरल्या जाव्यात, यासाठी सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्धी देऊन सरकार काही नियम बनवू शकेल. असे नियम लोकपालाशी चर्चा करून आणि त्याच्या संमतीनेच बनवावे लागतील.
२) तरतुदींचे सर्वसामान्यीकरण करण्याविषयी कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न बाळगता असे नियम खालील बाबींसाठी वापरता येतील.
ळ) लोकपालचा अध्यक्ष आणि सदस्य यांचे भत्ते आणि निवृत्तीवेतन आणि त्यांच्या सेवाविषयक अन्य अटी व शर्ती.
ळळ) सेक्शन ११ अंतर्गत उपविभाग २ (ह) खाली सिव्हिल न्यायालयाचे लोकपाल वापरू शकत असलेले अधिकार.

ळळळ) लोकपालमधील कर्मचारी व नोकरदार यांचे वेतन, भत्ते, भरती आणि सेवाविषयक अन्य अटी व शर्ती
ळीं) या कायद्याखाली नियम करणे आवश्यक असलेली अन्य एखादी बाब.

३) या कायद्याखाली तयार केलेला कोणताही नियम तयार करण्यामागची कारणमीमांसा स्पष्ट करून ती संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवली पाहिजे.

३३) अडचणी दूर करणे : राष्ट्रपती लोकपालाशी सल्लामसलत करून किंवा लोकपालाच्या विनंतीवरून आदेश काढून पुढील हेतूने काही तरतुदी करू शकतील.

ळ) या कायद्यातील तरतुदींचा प्रभावीपणे वापर होण्यासाठी.

ळळ) केंद्रीय देखरेख आयोगासमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणांची चौकशी आणि तपास लोकपालांसमोर पुढे सुरू ठेवण्यासाठी

३४) नियम करण्याचे अधिकार : संस्थेचे कामकाज सुरळितपणे चालावे, तसेच या कायद्यातील विविध तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी काही नियम करण्याचे लोकपालास अधिकार असतील.

३५) इतर सर्व कायद्यांतील तरतुदींपेक्षा या कायद्यातील तरतुदीं अधिक वरचढ मानल्या जातील किंवा त्यांना अधिक महत्त्व असेल.